**CNR : MHGA08-000312-2016**

**नि.फौ.ख.क.३१/२०१६**
**शासन—वि—भिमराव भक्तू**
**निशाणी कमांक ४२**

साक्षीदार नामे श्री रमन स्वामी जाडी हा तेलुगू भाषीक असल्यामुळे द्विभाषिकची नियुक्ती करणे गरजेचे असल्यामुळे न्यायालयातील शिपाई श्री भानया रामकिष्टू भक्तू यांना द्विभाषिक म्हणुन नियुक्ती करुन शपथ देण्यात आली आणि द्विभाषिकाद्वारे साक्षीदारांचे बयाण नोंदविण्यात आले.

सरकार तर्फे साक्षीदार कमांक ४ याची शपथेवर साक्ष
मी याद्वारे शपथपुर्वक निवेदन करतो की,

माझे नाव :— श्री रमन स्वामी जाडी,
माझे वय :— २५ वर्षे, धंदा :— शेती,
राहणार :— अमरावती, ता. सिरोंचा, जि. गडचिरोली.

सरतपास : श्री आर.एस.उंदिरवाडे, विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता

कोर्टात गैरहजर असलेल्या आरोपीला मी ओळखतो तसेच फिर्यादी प्रविण भक्तू यांना मी ओळखतो, कारण आरोपी व फिर्यादी हे माझ्या घराजवळ राहतात. घटना ही अंदाजे दोन वर्षापूर्वी घडली परंतु किती वाजता, कोणत्या ठिकाणी घडली हे मला माहिती नाही. आरोपीने फिर्यादीला चाकूने, त्याच्या डाव्या डोळयाजवळ मारहाण करुन जखमी केल्याचे मला सांगितले. घटनेच्या वेळी, मी माझ्या घरी हजर होतो. त्यानंतर, काय घडले हे मला माहिती नाही.

**उलटतपासणी : आरोपीतर्फे ॲड.श्री टी.जे. कोंडागोर्ला :**

हे म्हणणे खरे आहे की, मी प्रत्यक्ष घटना पाहिली नाही. कोणाचे कोणासोबत भांडण झाले हे मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, मला घटनेबाबत काहीही माहिती नाही.

**उलटतपासणी संपली.**

**फेरतपासणी काही नाही.**

| | |
|---|---|
| **वा.दा.ब.अ.क.केले** | **माझे समक्ष** |
| स्वा/— | स्वा/— |
| **(डी.डी.फुलझेले)** | **(डी.डी.फुलझेले)** |
| न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, सिरोंचा. | न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, सिरोंचा. |
| | दिनांक २६.०९.२०१९ |

मी साक्षीदाराने सांगितल्याप्रमाणे बयाण तेलुगू भाषेमधून मराठी भाषेत भाषांतरीत केले.

स्वा/—
( भानया रामकिष्टू भक्तू )
शिपाई,
दिवाणी व फौजदारी न्यायालय,
सिरोंचा

**CNR : MHGA08-000312-2016**

**नि.फौ.ख.क.३१/२०१६**
**शासन—वि—भिमराव भक्तू**
**निशाणी कमांक ४३**

साक्षीदार नामे श्री मारन्ना रोशन्ना उर्फ पोशन्ना भक्तू हा तेलुगू भाषीक असल्यामुळे द्विभाषिकची नियुक्ती करणे गरजेचे असल्यामुळे न्यायालयातील शिपाई श्री भानया रामकिष्टू भक्तू यांना द्विभाषिक म्हणुन नियुक्ती करुन शपथ देण्यात आली आणि द्विभाषिकाद्वारे साक्षीदारांचे बयाण नोंदविण्यात आले.

सरकार तर्फे साक्षीदार क्रमांक ५ याची शपथेवर साक्ष
मी याद्वारे शपथपुर्वक निवेदन करतो की,

माझे नाव :— श्री मारन्ना रोशन्ना उर्फ पोशन्ना भक्तू,
माझे वय :— ६० वर्षे, धंदा :— शेती,
राहणार :— अमरावती, ता. सिरोंचा, जि. गडचिरोली.

सरतपास : श्री आर.एस.उंदिरवाडे, विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता

कोर्टात गैरहजर असलेल्या आरोपीला मी ओळखतो, कारण आरोपी हा माझ्या घराजवळ राहतो. फिर्यादी हा माझा मुलगा आहे. घटना ही अमरावती गावाचे रस्त्यावर पडली परंतु किती वाजता घडली हे मला माहिती नाही. घटनेची तारीख, महिना व वर्षे मला माहिती नाही. घटना काय घडली हे मला माहिती नाही. आरोपीने फिर्यादी प्रविण भक्तू यांना चाकूने, त्याच्या डोळयाजवळ मारहाण केली होती. घटनेच्या वेळी, मी माझ्या घरी हजर होतो.

***साक्षीदार फितूर घोषित. सरकारी वकीलांनी उलटतपासणीची परवागनी मागितली. परवागनी देण्यात आली***.

हे म्हणणे खरे नाही की, दिनांक ०२/०४/२०१५ रोजी, रात्री ११.०० वाजताच्या दरम्यान, मी आणि माझा मुलगा प्रविण, घरी झोपून असतांना, आरोपीच्या घराजवळ, जोरजोराने ओरडण्याचा आणि झगडा भांडण सुरु असल्याचा आवाज मला आला. हे म्हणणे खरे नाही की, मी आणि माझा मुलगा प्रविण असे मिळुन घटनास्थळाकडे गेलो असता, आरोपी आणि त्याच्या पत्नीमध्ये झगडा भांडण चालू होते. हे म्हणणे खरे नाही की, माझा मुलगा प्रविण हा आरोपीचे भांडण सोडविण्याकरीता गेला. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी आणि माझा मुलगा शौचालयास बाहेर गेले. हे म्हणणे खरे आहे की, माझा मुलगा प्रविण हा घरी परत आला असतांना, त्याच्या डोक्याला मार लागून रक्त निघत होते. हे म्हणणे खरे नाही

की, मी फिर्यादी प्रविण यांना ''काय झाले'' अशी विचारणा केली असता, त्याने



सांगितले की, आरोपी आणि त्याच्या पत्नीमधील भांडण का सोडविले असे बोलून आरोपीने त्याला चाकूने मारुन जखमी केले. हे म्हणणे खरे आहे की, मी व माझा मुलगा प्रविण असे मिळुन पोलिस स्टेशन, सिरोंचा येथे जावून रिपोर्ट दिली.

**उलटतपासणी : आरोपीतर्फे ॲड.श्री टी.जे. कोंडागोर्ला :**

हे म्हणणे खरे नाही की, मला घटनेबाबत काहीही माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी प्रत्यक्ष घटना पाहिली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आज खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपासणी संपली.**

**फेरतपासणी काही नाही.**

| | |
|---|---|
| **वा.दा.ब.अ.क.केले** | **माझे समक्ष** |
| स्वा/— | स्वा/— |
| **(डी.डी.फुलझेले)** | **(डी.डी.फुलझेले)** |
| न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, सिरोंचा. | न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, सिरोंचा. |
| | दिनांक २६.०९.२०१९ |

मी साक्षीदाराने सांगितल्याप्रमाणे बयाण तेलुगू भाषेमधून मराठी भाषेत भाषांतरीत केले.

स्वा/—
( भानया रामकिष्टू भक्तू )
शिपाई,
दिवाणी व फौजदारी न्यायालय,
सिरोंचा